# बृहन्मुंबई महानगरपालिका

(सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग)

स आ. /एच पूर्व/1644/एस आर/सहा. अभि. (परि) दि. १५.०९.२०२५

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती</u>

एच/पूर्व विभागातील, सांताक्रुझ (पूर्व) मधील मस्जिद लेन, सिध्दार्थ नगर, वाकोला येथे टोटल स्टेशन सर्वेक्षण करण्याबाबत म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांच्याकडून अर्ज मागवित आहे.

म.न.पा. अधिकृत ठेकेदार यांनी या बाबतचा तपशील, अर्ज एच/ पूर्व विभाग कार्यालयातील मुख्य लिपिक (व्यय) एच/पूर्व विभाग यांच्याकडे संपर्क साधावा. सदर अर्जाचा नमुना हा रु. 360/- + 18% टक्के GST कर, इसारा अनामत रक्कम रू. 2000/- भरून मुख्य लिपिक (व्यय) 'एच/पूर्व' विभाग यांच्या कार्यालयात उपलब्ध होईल.

म.न.पा. अधिकृत ठेकेदारांचे अर्ज जमा करण्याची मुदत ही दि. 17.09.2025 रोजी दुपारी 1 वाजे पर्यंत असून, इसारा अनामत रकम दि. 16.09.2025 रोजी संध्याकाळी 5:00 वाजेपर्यंत मनपाच्या नागरी सुविधाकेंद्रामध्ये भरण्यात यावी. म.न.पा. अधिकृत ठेकेदाराने अर्ज दि. 17.09.2025 रोजी दुपारी 1 वाजे पर्यंत जमा करावे अर्ज जमा करताना सोबत म.न.पा. अधिकृत ठेकेदाराची मुळ कागदपत्रे सादर करणे गरजेचे आहे. अर्धवट तसेच चुकीचे भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी. तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 16.09.2025 रोजी दुपारी 5.00 नंतर अर्ज स्विकारते जाणार नाहीत.

तसेच सदरची सोडत ही दिनांक. 17.09.2025 रोजी दुपारी 1:00 नंतर सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात घेण्यात येईल. तसेच सदर कामाकरीता एक स्वतंत्र म.न.पा. अधिकृत ठेकेदार प्रतिक्षा यादीमध्ये घेण्यात येतील.

सदर सोडतीकरिता सर्व पात्र म.न.पा अधिकृत ठेकेदार राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी. कोणत्याही म.न.पा. अधिकृत ठेकेदाराचे एक पेक्षा जास्त पदाधिकारी यांना सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व विभाग यांच्या दालनात प्रवेश देण्यात येणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सहाय्यक आयुक्त एच/पूर्व विभाग यांनी राखुन ठेवलेला आहे. अट असलेली **स्वारस्य अभिव्यक्ती** स्विकारली जाणार नाही.

सही/-१५.०९.२०२५

**सहाय्यक अभियंता (परि.) एच/पूर्व**